**नियमित फौजदारी खटला क्र.१४५ /२०१८**
**निशाणी क्रमांक ३९**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ५ चा जबाब.**
**मी शपथेवर कथन करतो की,**

**माझे नांव** : अशोक संपत कदम,
**वय** : ६० वर्षे **व्यवसाय :** सेवानिवृत्त उप-निरीक्षक,
**राहणार** : पंचवटी,नाशिक.

**सरतपास सरकारी अभियोक्ता श्री. एस.एल.जोरवर यांचेमार्फत-**

१. दि.११/०७/२०१८ रोजी मी पिंपळगांव ब. पोलीस ठाण्यात कर्तव्यास होतो. दि.११/०७/२०१८ रोजी मी पोलीस ठाण्यात ठाणे अंमलदार म्हणुन कर्तव्यास होतो. मी अशोक मनोहर गांगुर्डे यांनी सांगितल्याप्रमाणे अपराध नोंदणी क्र.११२/२०१८ हा भा.द.वि. कलम ३२५,३२३,५०४,५०६ सह कलम ३४ प्रमाणे नोदंवुन घेतला होता. वरिष्ठांच्या आदेशानुसार प्रस्तुत गुन्हयाचा तपास माझ्याकडे सोपवण्यात आला होता.

२. दि.११/०७/२०१८ रोजी मी उंबरखेड शिवारात फिर्यादीचे शेतात जावुन घटनाठिकाण पंचनामा पंचासमक्ष नोंदवला. घटनाठिकाण आम्हांला फिर्यादी अशोक मनोहर गांगुर्डे यांनी दाखवले होते. घटनाठिकाण हे फिर्यादीचे शेत असुन सदर ठिकाणी सचे गवत कापलेले दिसुन आले. घटनाठिकाणी रैंदळीच्या निशाण्या दिसुन आल्या. घटनाठिकाणी दोन फुट लांबीचा पेरुचा लाकडी दांडा मिळुन आला. याव्यतिरीक्त घटनाठिकाणी अन्य काही वस्तु मिळुन आली नाही. मला आता घटनाठिकाणी जप्त करण्यात आलेला आर्टिकल-अ दांडा दाखवण्यात आला. तो मी ओळखतो. पंचनाम्याकामी पंच म्हणुन नाना पानसरे आणि गोरख पानसरे हजर होते. पंचनामा सायंकाळी १६.३० वा. सुरु करुन १७.३० वा. संपला. मला आता घटनाठिकाण पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. त्यास **नि.क्र.४०** देण्यात येते.

३. पोलीस ठाण्यात घटनास्थळावरुन जप्त केलेल्या मुद्देमालाची मुद्देमाल पावती फाडली. मला आता सदर पावती दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४१** देण्यात येते. तपासादरम्यान संबंधीत साक्षीदारांचे जबाब नोंदवले. तपासादरम्यान मी साक्षीदार दत्तु कचरु नाकोडे यांचा जबाब नोंदवला होता. फिर्यादी अशोक मनोहर गांगुर्डे यांनी ग्रामीण रुग्णालयातील त्यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यावरुन मी ते दोषारोपपत्रात

सामील केले. फिर्यादीने जिल्हा रुग्णालय नाशिक येथे त्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यावरुन मी ते दोषारोपत्रात सामील केले.

३. तपासादरम्यान असे निष्पन्न झाले की, आरोपीने फिर्यादीस लाकडी दांडयाने मारहाण करुन जखमी केले. आरोपी क्र.१ न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री आर.आर.मुंदडा यांच्यामार्फत...</u>**

४. घटना दि.२८/०६/२०१८ रोजी घडली होती. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद नि.क्र.३२ घटनेनंतर सुमारे १४ दिवसांनी दाखल केलेली होती. प्रस्तुत गुन्हयाचा तपास वरिष्ठांनी माझ्याकडे लेखी आदेशाने दिल्याबाबत मी कोणताही पुरावा दोषारोपपत्रात सामील केला नाही.हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर सुमारे १४ दिवसांनी मी घटनाठिकाण पचंनामा नि.क्र.४० नोंदवला होता. घटनाठिकाण पंचनामा ज्याठिकाणी नोंदवला त्या शेताचा गट क्रमांक मला सांगता येणार नाही. घटनाठिकाणचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या नातेवाईकांचे आणि शेजारच्या लोकांचे मी जबाब नोंदवले होते. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांचे जबाब मी पोलीस ठाण्यात नोंदवले. मला घटनाठिकाणच्या चतु:सिमा आठवत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, घटनाठिकाण पंचनामा नि.क्र.४० आम्ही पोलीस ठाण्यात बसुन नोंदवला.

५. हे म्हणणे खरे आहे की, आर्टिकल-अ प्रमाणे लाकडी दांडा शेतात कुठेही उपलब्ध होवु शकतो. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने आम्हांला लाकडी दांडा आणुन दिल्यावरुन त्याचा पंचनामा आम्ही नोदंवला.

६. मी आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये दिवाणी वादाबाबत तपास केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना फिर्यादीने मारहाण केल्याबद्दल आम्ही आरोपींची हेतुपुर्वक फिर्याद नोंदवली नव्हती. घटनेवेळी आरोपी तेथे आला तो म्हणाला की, तुझ्या बापाची जमीन आहे का, फिर्यादीला डाव्या खांदयावर मारल्यानंतर तो खाली पडला, नाना व दौलत यांनी फिर्यादीला लाथा बुक्यांनी मारहाण केली, फिर्यादीने नाशिकला दोन तीन दिवस उपचार घेतले असा मजकुर फिर्यादीने मला फिर्याद देतेवेळी सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया आशयाचा पुरावा गोळा करुन आरोपीविरुद्ध खोटे दोषारोपपत्र दाखल केले.

७. गट क्र.५५८/२ मधील जमीन आम्ही करत होतो, व काही जमीन आरोपी करत होते, अशोक गांगुर्डे सिव्हील हॉस्पीटल नाशिक येथे उपचार घेत असतांना तेथील डॉक्टरांनी त्यांचे खांदयाचे हाड मोडले असुन ऑपरेशनसाठी वेळ लागेल असा मजकुर साक्षीदार चंद्रकला सुनिल गांगुर्डे यांनी त्यांचा जबाब नोंदवतेवेळी मला सांगितला नव्हता. मी साक्षीदारांचे खोटे जबाब नोंदवले. दि. २८/०६/२०१८ रोजी आरोपी क्र.३ दौलत संपत गांगुर्डे कांदे विक्रीकामी पिंपळगांव ब. येथे आला असलेबाबत मी तपास केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, २८/०६/२०१८ रोजी आरोपी क्र.१ ते ३ यांनी फिर्यादी व त्याच्या पत्नीस लाकडी दांडयाने मारहाण करुन, शिवीगाळ करुन दमदाटी केली असे कधी घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी अशोक हा मोटारसायकलवरुन पडल्याने त्याच्या डाव्या खांदयाला दुखापत झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर सुमारे १४ दिवसांनी मला फिर्यादीची वैद्यकीय प्रमाणपत्रे प्राप्त झाली. हे म्हणणे खरे नाही की, सदोष तपास करुन खोटया आशयाचे दोषारोपपत्र सादर केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**माझे समक्ष**
**श्रवणोत्तर स्विकृती**

KOLEKAR PRASAD DIPAK
Digitally signed by KOLEKAR PRASAD DIPAK
Date: 2025.12.22 17:16:15 +0530

**दिनांक : २२/१२/२०२५**

**( पी. डी. कोळेकर )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**पिंपळगांव (ब)**